**<u>आर.सी.सी.क्र.१५६/२०२४</u>**
**सरकार वि. स निलेश वामन**
**नि.क्र.३२**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांचा पुरावा</u>**.

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – सुरेश संजय वामन,

वय - २७ वर्षे , व्यवसाय – शेती,

राहणार – आखतवाडे, ता. शेवगाव जि.अहमदनगर.

<u>सरतपासणी सहा. सरकारी वकील **श्रीमती पी.आर.गिते यांचेमार्फतः**</u>–

फिर्यादी ही माझी आई आहे. मी आरोपींना ओळखतो ते माझे भावकीतील आहेत.

०२. घटना ही साधारण दोन वर्षांपुर्वी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास घराजवळ घडली होती. त्यावेळी विहिरीच्या पाण्यावरुन आरोपी व आमच्या दरम्यान किरकोळ वाद झाला होता. त्या व्यतिरिक्त काही घडले नव्हते. पोलीसांनी घटनेबाबत माझ्याकडे चौकशी केली नव्हती. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला नव्हता.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजूर करण्यात आली).*

०३. हे म्हणणे खरे नाही की, दि.२२.०४.२०२४ रोजी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास आम्ही सर्वजण आमच्या घरासमोर असतांना सर्व आरोपी त्याठिकाणी आले व सामाईक विहिरीत काहीही संबंध नाही असे म्हणुन आरोपी मनिषा

हिने माझ्या आईच्या उजव्या पायावर काठीने मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी सोडविण्यासाठी गेलो असता ईतर आरोपींनी मला लाथाबुक्याने मारहाण केली व कोयत्याने हातपाय तोडुन टाकु अशी धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझे दाजी, बहिण, मामा व मामी यांनी सोडवासोडव केली. साक्षीदारास जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' वाचुन दाखवण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन माझ्या सांगण्याप्रमाणे तो नमुद करण्यात आला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचा व आरोपी दरम्यानचा वाद मिटलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचवण्यासाठी आजरोजी न्यायालयात मी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.एस.यु.लांडे यांचेमार्फतः</u>-

०४. उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृति -

KULKARNI DATTATRAYA RAMESH
Digitally signed by KULKARNI DATTATRAYA RAMESH
Date: 2026.03.12 16:24:52 +0530

ठिकाण - शेवगाव.
दिनांक- १२.०३.२०२६

(डी.आर.कुलकर्णी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी
कोर्ट नं.३ शेवगाव.